# प्रेस नोट

दि.२९/११/२०१८

**लोकसेवक पोहेकॉ/७७३ शेख जाकीर हुसैन अब्दुल सत्तार, नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांना २०००/— रुपयांची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडले.**

प्रस्तुत बातमीतील हकिगत अशी की, यातील तक्रारदार यांचा पूर्वी अवैध दारुचा व्यवसाय होता, त्याने तो आता बंद केला होता. तक्रारदार यांचे अवैध धंदयाचे हप्त्याचे पैसे म्हणुन यातील आरोपी लोकंसेवक पोहेकॉ/७७३ शेख जाकीर हुसैन अब्दुल सत्तार, वय—४९ वर्ष, नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांनी दि.२८/११/२०१८ रोजी तक्रारदार यांच्याकडे पंच साक्षीदारासमक्ष ६०००/— रुपये लाचेची मागणी केली व त्यापैकी २०००/— रुपये लाचेची रक्कम आज दि.२९/११/२०१८ रोजी नगर औरंगाबाद रोडवरील टॉपअप पेट्रोल पंप, अहमदनगर येथे पंच साक्षीदारासमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

सदर सापळा कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर युनिटने केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयामार्फत सर्व सामान्य जनतेला आवाहन करण्यात येते की, त्यांना कोणी शासकिय नोकर शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करत असेल तर त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, अहमदनगर येथे खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. त्यासाठी १०६४ हा निशुल्क टोल फ्रि नंबर सुरु करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| **कार्यालयाचा पत्ता** | **पोलीस उप अधीक्षक कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर** |
| **फोन नंबर** | ०२४१—२४२३६७७ |
| **टोल फ्रि नंबर** | १०६४ |

**(किशोर चौधरी)**
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर

Scanned by CamScanner